सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ रु. स्वागत मूल्य

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ७१ | शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
५ डिसेंबर

- आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिवस
- जागतिक मृदा दिन
- गौरव गिलने २०१६ एशिया पॅसिफिक रॅली चॅम्पियनशिप जिंकली.
- 'कार्ल कोरी' नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ यांचा जन्म.
- 'सज्जन जिंदाल' भारतीय उद्योगपती यांचा जन्म.
- 'रविश कुमार' भारतीय पत्रकार आणि लेखक यांचा जन्म.
- 'शिखर धवन' भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
- 'दादामहाराज सातारकर' प्रवचनकार यांचे निधन.
- 'किशनराव भुजंगराव राजूरकर' ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक यांचे निधन.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**

**जय भारत...! जय स्वदेशी...!!**






(छायाचित्रे : नितेश बारी)

# श्रीदत्त जयंतीनिमित्त श्री मंगळग्रह मंदिर परिसरात भव्य याग

## भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरणात जन्मोत्सवासह विविध कार्यक्रमांचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित ख्यातनाम श्री मंगळग्रह मंदिर परिसरात श्रीदत्त जयंतीनिमित्त गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरणात जन्मोत्सवासह भव्य याग व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंदिर परिसरातील 'कमंडलू'स्थित भगवान श्रीगुरुदत्त व श्री अनघालक्ष्मी माता मंदिरात सकाळपासून सायंकाळपर्यंत जन्मोत्सव, याग, हवन, बलिदान यासारख्या विविध पूजा-अर्चांसह मंत्रोपचार झाले. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांना भक्तिमय आणि चैतन्यमय वातावरणातील सकारात्मक अनुभूतीचा प्रत्यय आला.

भव्य यागासाठी नागपूर येथील सुप्रसिद्ध उद्योजक रेयांशराज रत्ननिवास राणाजीत ऊर्फ लकी बन्सल, त्यांच्या मातोश्री गं. भा. रतिका रत्ननिवास राणाजीत, जळगावातील वास्तुतज्ज्ञ डॉ. मेहुल पटेल तसेच प्रसाद मुकुंद भंडारी व पुषंद उल्हास ढाके सपत्नीक यजमान होते. त्यांच्या




हस्ते सुरूवातीला प्रथम सत्रात सकाळी ९ ते ११ या वेळेत पंचांग कर्म : त्यात प्रायश्चित्त, श्रीगणेश पूजन, वरुण पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, आयुष्यमंत्र जप, नांदी श्राद्ध झाले. ११ ते दुपारी १ दरम्यान स्थापना कर्म : त्यात दत्त भद्र स्थापन, दत्तपीठ स्थापन, दत्तयंत्र स्थापन, देवता प्रतिष्ठा करण्यात आली. त्यानंतर द्वितीय सत्रात दुपारी २ ते ४ या वेळेत अभिषेक महापूजा : ५१ विशिष्ट वनौषधींयुक्त महाभिषेक, कुंडदेवता स्थापना, नवग्रह स्थापना, रुद्र स्थापना, कुशकंडीका, ग्रह हवन झाले. दुपारी ४ ते सायंकाळी ५ दरम्यान प्रधान देवता होम : दत्तमाला मंत्र, होम, विशेष होम, उत्तरांग होम झाला. सायंकाळी ५ ते ६ या वेळेत बलिदान व पूर्णाहुती झाली. त्यानंतर सायंकाळी ६ ते ७ या वेळेत श्रीदत्त महाराज, श्री मंगळग्रह देवता, मंगळेश्वर श्री पंचमुखी हनुमानजी, मंगळेश्वरी श्री भूमिमाता यांची महाआरतींसह करुणा त्रिपदी विधी पार पडून यागाची सांगता झाली. याप्रसंगी मंदिरात भाविकांना दिवसभर प्रसादाचे वाटप करण्यात आले.

पुरोहित परशुराम शर्मा, शुभम वैष्णव, यश जोशी, चंद्रकांत जोशी, भूषण जोशी, मंदार कुलकर्णी यांनी पौरोहित्य केले. त्यांना अतुल दीक्षित, अक्षय जोशी, वैभव लोकाक्षी, हेमंत गोसावी, चेतन नाईक यांनी सहकार्य केले.

याप्रसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त अनिल अहिरराव, श्रीमती जयश्री साबे, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, सौ. सुनीताताई कुलकर्णी, सौ. आशाताई महाले यांच्यासह भाविक व मंदिरातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोरी नदी पात्रातून खुलेआम अवैध वाळू उपसा!

## प्रशासनाचे दूर्लक्ष; पर्यावरणप्रेमींसह नारिकांमध्ये नाराजी



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शहरातील बोरी नदीपात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी प्रशासनाकडून गुप्तवाटा बंद करणे, गस्त वाढवणे, बंदोबस्त तैनात ठेवणे आदी उपाययोजना सुरू आहेत. मात्र, शहरातील फरशी रोडवरील बोरी पात्रात खुलेआम दिवसाढवळ्या अवैध वाळू उपसा सुरू आहे. छोट्या टेम्पोमधून अवैध वाळू वाहतूक सुरू आहे. याकडे महसूल प्रशासनाचे अक्षम्य दूर्लक्ष आहे. त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पर्यावरणप्रेमींसह नारिकांमध्ये नाराजी.

तापी, बोरी व पांझरा नदीपात्रातील विविध ठिकाणी खोदलेले खड्डे, बंद करण्यात आलेल्या गुप्तवाटा आणि पथके तैनात असल्याचे केवळ कागदोपत्रीच दिसून येत आहे. शहरातील बोरी नदीवरील पुलाच्या समोरच अवघ्या काही मीटरवर अवैध वाळू उपसा सुरू ओ. याबाबत पर्यावरणप्रेमींसह नागरिकांनी नराजी व्यक्त केली आहे. अधिकाऱ्यांनी ही बाब निदर्शनास येत नाही, का असा प्रश्नही नागरिक विचारत आहेत. नदीपात्रातून वाळू भरलेले टेम्पो निर्धास्तपणे शहरातून जाताना दिसत आहेत. त्यामुळे महसूल पथकाचा 'बंदोबस्त नेमका कुठे? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शहरातील बोरी पात्राच्या परिसरात चौफेर वस्ती आहे. संत सखाराम महाराज वाडी समोरील मंदिर, पूल आणि रस्त्याच्या मधोमध होत असलेला हा उपसा कुणाच्याही नजरेतून सुटणारा नाही. उलटपटी प्रशासनालाच जणू हे आव्हानच आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. वाळू उपसा थांबवण्यासाठी केवळ बैठका, गुप्तवाटा बंद करणे किंवा फोटोसेशन पुरेसे नाही. प्रत्यक्ष कारवाई, ठोस बंदोबस्त आणि कडक दंडात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. प्रशासनाचे कारवाईबाबतचे दावे एकीकडे आणि अवैध वाळू उपसा दुसरीकडे हीच स्थिती पुढेही कायम राहील, हे मात्र निश्चित!

# वाढत्या थंडीमुळे उद्भवल्या दातांच्या समस्या!

## अमळनेरात रूग्णसंख्येत वाढ; काळजी घेण्याचे दंत चिकित्सकांचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गुलाबी थंडीची चाहूल लागताच आल्हाददायक वातावरणासोबतच आरोग्याच्या तक्रारीही डोके वर काढतात. थंडीत सहसा त्वचा आणि सर्दी-खोकल्याची काळजी घ्यावी लागते. मात्र, दातांच्या आरोग्याकडे अनेक जण दुर्लक्ष करतात. सध्या शहरात तापमानाचा पारा चांगलाच घसरला आहे. दंत चिकित्सालयांमध्ये दात सळसळणे, सेन्सिटिव्हिटीच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे, असे दंतरोग तज्ज्ञांनी सांगितले.



थंडीत तापमान अचानक कमी होते. त्यामुळे दातांच्या आतील मज्जातंतूंवर परिणाम होतो. ज्यांना आधीच 'डेंटिन हायपरसेन्सिटिव्हिटी'चा त्रास आहे, त्यांना थंड हवेचा किंवा थंड पाण्याचा स्पर्श होताच तीव्र कळा निघतात. थंडीत पाणी कमी प्याल्याने लाळ निर्मिती कमी होऊन बॅक्टेरिया वाढण्याची शक्यता असते.

### थंड पाण्याऐवजी कोमट पाणी वापरा

सकाळी ब्रश करताना आणि चूळ भरताना अतिशय थंड पाण्याऐवजी कोमट पाण्याचा वापर करावा. यामुळे दातांना धक्का बसत नाही. दात सळसळणे कमी होते. ब्रशचे धागे कडक असतील, तर ते बदला. हिवाळ्यात हिरड्या आणि दात संवेदनशील असतात. त्यामुळे 'सॉफ्ट' टूथब्रशचा वापर करा. जास्त जोर लावून ब्रश करणे टाळा. सेन्सिटिव्हिटीचा त्रास असेल, तर डॉक्टरांच्या सल्ल्याने 'डिसेन्सिटायझिंग टूथपेस्ट' वापरा. हिवाळ्यात तहान लागत नाही, पण शरीराला पाण्याची गरज असते. भरपूर पाणी प्यायल्याने लाळ तयार होण्यास मदत होते. जी नैसर्गिकरित्या दात स्वच्छ ठेवते. अतिगोड आणि चिकट पदार्थ टाळा. व्हिटॅमिन सी आणि कॅल्शियमयुक्त आहार घेतल्यास हिरड्या मजबूत राहतात.

थंडीत उद्भवतात या समस्या

**दात सळसळणे :** थंड हवा, थंड पाणी किंवा आंबट पदार्थ खाताना दातांमध्ये अचानक कळ येणे.

**जबडा दुखणे :** थंडीमुळे स्नायू आकुंचन पावतात. काहींना जबडा दुखणे किंवा तो कडक होण्याचा त्रास होतो.

**हिरड्या सुजणे :** रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे आणि बॅक्टेरियाच्या वाढीमुळे हिरड्यांना सूज येऊ शकते.

**तोंड कोरडे पडते :** थंडीत ओठ फाटतात. तोंड कोरडे पडते. त्यामुळे तोंडाचे आरोग्य बिघडते. हिरड्या व दातांच्या समस्या वाढलेल्या रुग्णांची संख्या हिवाळ्यात वाढलेली आहे. दातांच्या सळसळण्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे पुढे जाऊन 'रूट कॅनल' करण्याची वेळ येऊ शकते. घरगुती उपचारांनी फरक पडत नसल्यास त्वरित दंततज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन दंत चिकित्सकांनी केले आहे.

# मोठेबाबा पुण्यतिथीनिमित्त रविवारपासून कीर्तन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील ढेकू रस्त्यावरील (वै.) ह. भ. प. मोठेबाबा मंदिर विश्वस्त मंडळातर्फे गुरुवर्य मोठे बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त किर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ७ डिसेंबरला सप्ताहास सुरुवात होईल. रविवार, दि. १४ डिसेंबरला किर्तन सप्ताहाची सांगता होईल. दररोज पहाटे ४ ते ६ काकड आरती, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ आणि रात्री ८ ते १० हरी कीर्तन होणार आहे. ७ रोजी ह. भ. प. निवृत्ती पाटील महाराज, ८ डिसेंबर रोजी ह.भ.प. पोपटराव महाराज, ९ डिसेंबर रोजी ह.भ.प. महेश महाराज, १० डिसेंबर रोजी ह.भ.प. मुकुंदा महाराज, ११ डिसेंबर रोजी ह.भ.प. हरिदास महाराज, १२ डिसेंबर रोजी ह.भ.प. परमेश्वर महाराज, १३ डिसेंबर रोजी ह.भ.प. गोविंद महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल. शुक्रवार, दि. १३ डिसेंबर रोजी पालखी व दिंडी सोहळा होणार आहे. १४ डिसेंबर रोजी काल्याचे किर्तन व महाप्रसाद वाटपाने सप्ताहाची सांगता होईल.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678

रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# तरुणांमध्ये कर्करोगाचा धोका : ‘या’ ३ सवयींमुळे वाढते जोखीम, आताच सावध व्हा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या वेगवान जीवनशैलीत तरुण पिढी आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. याचा परिणाम म्हणून कर्करोगासारखा प्राणघातक आजार झपाट्याने वाढत आहे. तज्ज्ञांच्या मते– तीन प्रमुख सवयींमुळे शरीरात विषारी बदल होतात. ज्यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो. या सवयी आताच बदलल्या नाहीत, तर भविष्यात मोठी किंमत मोजावी लागू शकते.

**तरुणांमध्ये कर्करोगाची वाढती लाट**

पूर्वी कर्करोग हा वयोवृद्धांचा आजार समजला जायचा. आता २० ते ४० वयोगटातील तरुणांमध्येही याचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ब्रिटनच्या बीएमजे ग्रुपच्या अहवालानुसार १९९९ ते २०१९ या २० वर्षांत ५० वर्षांखालील लोकांमध्ये कर्करोगाच्या रुग्णसंख्येत ७९ टक्के वाढ झाली आहे. यात स्तनाचा कर्करोग सर्वाधिक आहे. त्यानंतर श्वासनलिका आणि फुप्फुसाचा कर्करोग प्राणघातक ठरत आहेत.



विशेषतः ५० वर्षांखालील महिलांमध्ये मृत्यूदरही चिंताजनक आहे. अँड्रोमेडा कॅन्सर हॉस्पिटलचे वरिष्ठ सल्लागार डॉ. रमन नारंग म्हणतात, की कर्करोग हा आपल्या रोजच्या सवयींमुळे पसरतो. चुकीचा आहार, तणाव आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे शरीरात अनियंत्रित पेशीवाढ होते. जी कर्करोगाला कारणीभूत ठरते. वेळेत उपचार न झाल्यास हा आजार जीवघेणा ठरू शकतो.

**डॉक्टरांचा सल्ला**

डॉ. नारंग सांगतात, की आहारात ताजे, नैसर्गिक आणि घरगुती अन्नाचा समावेश करा. फास्ट फूड, शीतपेये आणि प्रोसेस्ड पदार्थ टाळा. नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि मानसिक शांतता हाच कर्करोगापासून बचावाचा सर्वोत्तम मार्ग आहे. ते पुढे म्हणतात, की फास्ट फूडमधील नायट्रेट्स आणि टॉक्सिन्स शरीरात साठून कर्करोगाच्या पेशींना चालना देतात. त्यामुळे सावधगिरी बाळगा. कर्करोगाचे संकट आता वयावर नव्हे, तर सवयींवर अवलंबून आहे. लठ्ठपणा, तणाव आणि शारीरिक निष्क्रियता या तीन सवयी आताच बदलल्या नाहीत, तर पुढील दशकात तरुण पिढीला कर्करोगाचे गंभीर परिणाम भोगावे लागू शकतात. निरोगी जीवनशैली अंगीकारून या धोक्यापासून स्वतःचा बचाव करा.

## कर्करोगाची तीन प्रमुख कारणे

**१) लठ्ठपणा**

अमेरिकन नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अहवालानुसार ४ ते ८ टक्के कर्करोगांच्या प्रकरणांत लठ्ठपणा हे मुख्य कारण आहे. जास्त चरबीमुळे हार्मोनल असंतुलन आणि सूज वाढते. ज्यामुळे स्तन, गर्भाशय, मोठे आतडे आणि मूत्रपिंडाच्या कर्करोगाचा धोका वाढतो.

**२) मानसिक तणाव**

पबमेड सेंट्रलच्या अभ्यासानुसार कामाचा तणाव आणि झोपेचा अभाव यामुळे कॉर्टिसॉलसारखे हार्मोन्स असंतुलित होतात. यामुळे पेशींचे नुकसान होते आणि कर्करोगाची जोखीम वाढते. आजची तरुणाई तणावाखाली जगते, जे कर्करोगाचे नवे ट्रिगर बनत आहे.

**३) शारीरिक हालचालींचा अभाव**

बसून राहण्याच्या जीवनशैलीमुळे रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. शरीरात विषारी घटक साचतात. नियमित व्यायाम किंवा चालणे यासारख्या हालचाली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवतात. कर्करोगाचा धोका कमी करतात.

# आयपीएस सिमाला प्रसाद : पहले प्रयास में यूपीएससी क्रैक कर बनीं अधिकारी, फिल्मों में अभिनय से जीता दिल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी जैसी कठिन परीक्षा को पहले ही प्रयास में पास करना और फिर फिल्मों में अभिनय से पहचान बनाना, यह है मध्य प्रदेश की आयपीएस सिमाला प्रसाद की प्रेरक कहानी। एक ईमानदार पुलिस अधिकारी होने के साथ-साथ वे एक प्रतिभाशाली अभिनेत्री भी हैं, जो प्रशासन और कला के बीच संतुलन बनाए रखती हैं।



सक्सेस स्टोरी

**प्रशासनिक सेवा से सिल्वर स्क्रीन तक**

भोपाल में जन्मीं सिमाला वर्तमान में मध्य प्रदेश के बैतूल जिले में एस.पी. के पद पर तैनात हैं। उन्होंने २०१६ में फिल्म ‘अलिफ’ से बॉलीवुड में डेब्यू किया, जहां उनके अभिनय को खूब सराहना मिली। इसके बाद २०१९ की फिल्म ‘नक्काश’ में कुमुद मिश्रा और शारिब हाशमी जैसे कलाकारों के साथ उनकी सादगी और गंभीरता ने दर्शकों का ध्यान खींचा। जल्द ही वे ‘द नर्मदा स्टोरी’ में एक सशक्त जांच अधिकारी के किरदार में नजर आएंगी। यह सच्ची घटनाओं पर आधारित पुलिस ड्रामा थ्रिलर है, जिसका निर्देशन जैगम इमाम ने किया है और इसमें रघुबीर यादव, मुकेश तिवारी और अंजलि पाटिल जैसे कलाकार भी हैं।

**शानदार शैक्षिक और पारिवारिक पृष्ठभूमि**

सिमाला एक प्रतिष्ठित परिवार से हैं। उनके पिता डॉ. भागीरथ प्रसाद १९७५ बैच के आयएएस अधिकारी, पूर्व सांसद और दो विश्वविद्यालयों के कुलपति रह चुके हैं। उनकी मां मेहरुन्निसा परवेज एक प्रसिद्ध साहित्यकार और पद्म श्री से सम्मानित हैं। सिमाला ने पहले एमपीपीएससी पास कर डीएसपी के रूप में करियर शुरू किया। इसके बाद, बिना कोचिंग के यूपीएससी सीएसई २०१० में ऑल इंडिया ५१ वीं रैंक हासिल कर आयपीएस बनीं।

**कला और सेवा का अनूठा संगम**

सिमाला केवल वर्दी और कैमरे तक सीमित नहीं हैं। वे सांस्कृतिक कार्यक्रमों में नृत्य और अभिनय के जरिए अपनी रचनात्मकता दिखाती हैं। उनका मानना है कि जीवन के हर जुनून को जीना चाहिए। सिमाला की कहानी साबित करती है कि दृढ़ संकल्प और मेहनत से एक व्यक्ति कई क्षेत्रों में अपनी पहचान बना सकता है।

# रात्री दही खाणे सुरक्षित आहे का? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दही भारतीय आहाराचा महत्त्वाचा भाग आहे. त्याच्या थंडसर गुणधर्म, प्रवेग-प्रोबायोटिक्स आणि ऊर्जा देण्याच्या क्षमतेमुळे ते विविध आहारजोग्यात महत्त्वपूर्ण मानले जाते. रात्री दही खाणे नाही किंवा नाही यावरील प्रश्नांचे उत्तर खाली आहे.

रात्री चयापचय थोडे मंद असते, त्यामुळे दह्यातील प्रोबायोटिक्स पचनास मदत करून आम्लता, पोटफुगण्याची शक्यता कमी करतात.

**तृप्ती टिकविते :** दही प्रथिनयुक्त असल्यामुळे रात्रभर तृप्ती टिकवण्यास मदत करते, ज्यामुळे अतीशय उशिरा अन्न घेण्याची प्रवृत्ती कमी होते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढवते :** दह्यातील जीवंत संस्कृती आतड्यांची आरोग्य सुधारतात. ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीचाही पाया मजबूत होतो.

**त्वचा आणि हाडे सुधारणा :** काही संशोधनातून दर्शविले आहे, की दह्यातील काही घटक त्वचेला पूरक होऊ शकतात. वाळणाऱ्या त्वचेतील निरोगी पुनरुत्पादनास मदत करतात. तसेच कॅल्शियम-फॉस्फरस प्रमाण योग्य असल्यामुळे रात्री हाडे आणि दात मजबूत होण्यास मदत असते.

**पोट शांततेसाठी :** दहीचे थंड गुणधर्म पोटातील आक्रमकतेत कमी करतात आणि काही लोकांना झोपेपूर्व पिसफूल अनुभव देतात.

**रात्री दही खाणे कधी टाळावे?**

काही लोकांना दह्यातील घटक जड जाऊ शकतात. जर तुम्हाला दह्या खाल्यानंतर पोटात अडचण, अतिशय गळ, किंवा पोटात वेदना असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मार्गक्रमण करणे चांगले. जर तुम्हाला सुलभ डायजेस्टिबिलीटी हवाय असेल तर ताक किंवा कडधान्य/छास-रायता या पर्यायांचा विचार केला जाऊ शकतो.

**सूर्यास्तानंतर दही खाणे सुरक्षित आहे का?**

होय. सूर्यास्तानंतर दही खाणे सुरक्षित आहे. परंतु आहारातील एकूण पोटपोषण तुमच्या शरीराच्या गरजेच्या अनुरूप असले पाहिजे.

**झोपण्यापूर्वी दही खावे की नाही?**

बहुतेक लोकांसाठी घडण्याची गरज नाही. काही लोकांना रात्री शांत पचनासाठी थोडे आधीचा डिनर आणि दह्याशी जुळवून घेणे चांगले वाटते. जर तुम्हाला दह्यातील लैक्टिक ॲसिड किंवा प्रथिनं सहजपणे पचवता येत असल्यास, रात्री दही चांगले ठरते. मसाला-आहार : काळी मिरी, जिरे यांसारखे मसाले काही लोकांच्या पचण्यात आराम देतात. तुमच्या पचनानुसार ट्राय-एंड-एरर पद्धती अवलंबा.

तुम्ही कसा घेणार? मार्गदर्शक तत्त्वे दह्यातील प्रोबायोटिक्सचा लाभ घेण्यासाठी ताजी, अप्रकाशित किंवा कुरकुरीत दही निवडा.















हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# श्री अनिरुध्द उपासना फाऊंडेशनतर्फे श्रीक्षेत्र निम येथे श्रीदत्त जयंती उत्साहात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- श्री अनिरुद्ध उपासना फाऊंडेशनतर्फे तालुक्यातील निम येथे दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. गुरुवार, दि. ४ डिसेंबर रोजी त्रिवेणी संगमावर हा कार्यक्रम पार पडला. जळगाव, धुळे, नंदुरबार, शिरपूर, अमळनेर परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सकाळी ८ वाजता श्री दत्त कैवल्य याग झाला. १० वाजता श्री दत्तात्रेय उदी कुंभाची पालखी मिरवणूक काढण्यात आली. "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा"च्या गजराने परिसर दुमदुमला होता. पालखी मुख्य मंडपात दाखल झाली. दुपारी १२ वाजता श्रीदत्त, श्री स्वामी समर्थ, श्री साईनाथ आणि सद्गुरु श्री अनिरुद्ध यांची आरती झाली. त्यानंतर प्रदक्षिणा आरती झाली. झेंडूच्या फुलांची आकर्षक सजावट, मंडपातील गुढ्या, तोरणे आणि केळीचे खांब यामुळे परिसराला मनमोहक रुप आले होते. या उत्सवासाठी राज्यातील विविध भागातून व ग्रामीण भागातूनही मोठ्या संख्येने भाविकांनी हजेरी लावली.















